# ‘प्रसिध्दी पत्रक’

# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद

**सोमवार, दि.०९/०९/२०१९**

---

## “अवैध मद्य विक्री विरुध्द ४ कारवाया”

**पोलीस ठाणे, भुम:** दि. ०८.०९.२०१९ रोजी १४.३० वा. सु. बायडाबाई शिवाजी काळे रा. सोनगीरी, ता.भुम ही दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने मौजे सोनगीरी येथे १० ली. गावठी दारु किं.अं. ५२०/रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, भुम यांच्या पथकास आढळुन आली. यावरुन तिच्याविरुध्द पोलीस ठाणे, भुम येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. ०८.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**पोलीस ठाणे, ढोकी:** दि. ०८.०९.२०१९ रोजी १४.०० वा. सु. अनिता जालिंदर शिंदे रा. भिकारसारोळा पारधी पिडी, ता.उस्मानाबाद ही दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने भिकारसारोळा पारधी पिडी येथे १० ली. गावठी दारु किं.अं. ६५०/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, ढोकी यांच्या पथकास आढळुन आली. यावरुन तिच्याविरुध्द पोलीस ठाणे, ढोकी येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. ०८.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**पोलीस ठाणे, बेंबळी:** दि. ०८.०९.२०१९ रोजी १५.५० वा. सु. जयराम गजेंद्र क्षीरसागर रा. दारफळ, ता.जि.उस्मानाबाद हा दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने दारफळ पाटी येथे देशी-विदेशी दारुच्या बाटल्या किं.अं. ३,५९३/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, बेंबळी यांच्या पथकास आढळुन आला. यावरुन त्याच्याविरुध्द पोलीस ठाणे, बेंबळी येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. ०८.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**पोलीस ठाणे, तुळजापूर:** दि. ०८.०९.२०१९ रोजी १७.१० वा. सु. आप्पाराव गोविंद मस्के रा. बारुळ, ता.तुळजापूर हा दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने मौजे बारुळ शिवारात देशी-विदेशी दारुच्या बाटल्या किं.अं. २,८८०/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना स्थानिक गुन्हे शाखा (LCB), उस्मानाबाद यांच्या पथकास आढळुन आला. यावरुन त्याच्याविरुध्द पोलीस ठाणे, तुळजापूर येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. ०९.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

## “परंडा: हॉटेलमधील जेवणाचे बिल देण्याच्या कारणावरुन मारामारी.”

**पोलीस ठाणे, परंडा:** दि. ०८.०९.२०१९ रोजी १६.३० वा. सु. अथर्व हॉटेल समोर, कुर्डूवाडी रोड, परंडा येथे १) फिरोज शफीक काझी २) किशार तायप्पा शिंदे ३) विशाल अंबादास कडबणे तिघे रा. परंडा यांनी हॉटेलमध्ये जेवण केल्यानंतर बिलाच्या कारणावरुन आपापसांत मारामारी करुन सार्वजनिक शांतता भंग करत असतांना पोलीस ठाणे, परंडा यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, परंडा येथे भा.दं.वि. कलम १६० प्रमाणे गुन्हा दि. ०८.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

## “महिला विनयभंग, गुन्हे दाखल.”

**पोलीस ठाणे, नळदुर्ग:** दि. ०८.०९.२०१९ रोजी एक महिला (नाव-गाव गोपनीय) तिच्या घरी एकटी असतांना अरुण राम हळदे रा. धनगरवाडी, ता.तुळजापूर याने घरामध्ये घुसून त्या महिलेचा हात धरुन तिच्या सोबत झोंबाझोंबी व शिवीगाळ करुन तिला जिवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच तिस लज्जा वाटेल असे वर्तन करुन तिचा विनयभंग केला. अशा मजकुराच्या पिडीत महिलेच्या फिर्यादीवरु वरील आरोपीविरुध्द पोलीस ठाणे, नळदुर्ग येथे भा.दं.वि. कलम ३५४, ३५४(अ), ४५२, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दि. ०८.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**पोलीस ठाणे, परंडा:** जयपाल सदाशिव बगाडे रा. परंडा, ता.उसमानाबाद याने मागील दोन महिन्यांपासुन अनेकदा एका महिलेस (नाव-गाव गोपनीय) ईशारे केले. तसेच दि. ०७.०९.२०१९ रोजी २३.४३ वा.सु. तिला फोन करुन अश्लील संवाद करुन तिचा विनयभंग केला. अशा मजकुराच्या पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन वरील आरोपीविरुध्द पोलीस ठाणे, परंडा येथे भा.दं.वि. कलम ३५४, ३५४ (ड) प्रमाणे गुन्हा दि. ०८.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

## “दोन कुटूंबांत मारहान-विनयभंग परस्पर विरोधी दोन गुन्हे दाखल.”

**पोलीस ठाणे, ढोकी:** मौजे तडवळा शिवारात दोन कुटूंबांत (नाव गोपनीय) दि. ०९.०९.२०१९ रोजी १४.०० वा. सु. जुन्या भांडणाच्या कारणावरुन शिवीगाळ, मारहान होउन दोन्ही कुटूबीयांनी विरोधी गटास जिवे ठार मारण्याची धमकी दिली. तसेच दोन्ही कुटूंबीयांतील महिलांचा विरुध्द गटाने विनयभंग केला. या मारहानीत दोन्ही गटातील स्त्री-पुरुष सदस्य जखमी झाले आहेत. अशा मजकुराच्या दोन्ही कुटूंबांतील पिडीत महिलांनी दिलेल्या फिर्यादीवरुन परस्पर विरोधी दोन्ही कुटूंबीयांवर पोलीस ठाणे, ढोकी येथे भा.दं.वि. कलम ३५४, ३५४ (ब), ३२३, ३२४, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हे दि. ०९.०९.२०१९ रोजी दाखल करण्यात आले आहेत.

## “उमरगा: टेम्पो-अज्ञात वाहनाच्या अपघातात टेम्पो चालकाचा मृत्यु.”

**पोलीस ठाणे, उमरगा:** गुरुचरण महादेव देवकते वय ३३ वर्षे (चालक) रा. बानेगाव, ता.उत्तर सोलापूर हे दि. १८.०८.२०१९ रोजी २३.०० वा. सु. टेम्पो क्र. एम.एच. १३ सीयु ८४९७ मध्ये पिव्हीसी पाईप भरुन राष्ट्रीय महामार्ग क्र. ६५ वरुन सोलापूर ते गुंटूर चालवत जात होते. उमरगा येथे आले असता गुरुचरण देवकते (मयत चालक) याने टेम्पो निष्काळजीपणे चालवुन पुढे चालत असलेल्या अज्ञात वाहनास पाठीमागुन धडक दिली. यात तो स्वत: जखमी होउन मयत झाला. तर त्याच्या वाहनातील ज्ञानेश्वर चाफाकरंडे (टेम्पो चालकाचे सहाय्यक) हे जखमी झाले आहेत. अशा मजकुराच्या ज्ञानेश्वर महासिध्द चाफाकरंडे (टेम्पो चालकाचे सहाय्यक) रा. बानेगाव, ता.उत्तर सोलापूर, यांनी वैद्यकीय उपचारादरम्यान दिलेल्या जबाबावरुन (एम.एल.सी.) मयत टेम्पो चालकाविरुध्द पोलीस ठाणे, उमरगा येथे भा.दं.वि. कलम २७९, ३३८, ३०४ (अ) सह मो.वा.का. कलम १८४ प्रमाणे गुन्हा दि. ०८.०९.२०१९ रोजी दाखल करण्यात आला आहे.

## “परंडा: जबरी चोरी.”

**पोलीस ठाणे, परंडा:** श्रीराम महादेव खरात रा. डोंबगाव, ता.परंडा, प्रशांत नरसाळे, रमेश खताळ (सुरक्षा रक्षक) हे तिघे नेहमी प्रमाणे दि. ०९.०९.२०१९ रोजी रात्री ०२.३० वा. सु. अजिंक्यराजे पेट्रोलीयम येथे काम करत होते. त्यावेळी तिन अनोळखी पुरुषांनी त्यांच्या डोळ्यात मिरची पुड टाकली तर प्रशांत नरसाळे यांना

कोयत्याच्या उलटयाबाजुने मारहान करुन जखमी करुन पेट्रोल पंपावरील रोख रक्कम १,९२,५७०/- रु. व नमुद तिन्ही कामगारांचे तिन मोबाईल फोन-एकुण किंमत ५,१००/- रु. असा एकुण १,९७,६७० रु. चा माल जबरदस्तीने चोरुन नेला आहे. अशा मजकुराच्या पेट्रोल पंप कामगार श्रीराम खरात यांच्या फिर्यादीवरुन अनोळखी तिन चोरट्यांविरुध्द पोलीस ठाणे, परंडा येथे भा.दं.वि. कलम ३९४ प्रमाणे गुन्हा दि. ०९.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**"तुळजापूर: सोन्याचे दागीने व रोख रक्कम चोरीस."**

**पोलीस ठाणे, तुळजापूर:** योगेश सिध्देश्वर साळुंके रा. बेगडा, ता.जि. उस्मानाबाद (ह.मु. विश्वास नगर, हडको, तुळजापूर) हे घराला कुलूप लाउन बाहेरगावी गेले असता दि. ०५.०९.२०१९ रोजी १५.०० ते दि. ०८.०९.२०१९ रोजी १८.०० वा. चे दरम्यान त्यांच्या घराच्या दरवाज्याचा कडी-कोयंडा कोणीतरी अज्ञात चोरट्याने तोडुन घरातील ३१ ग्रॅम सोन्याचे दागीने-किं.अं. ९०,०००/- रु., चांदीचे दागीने-किं.अं.१,५००/- रु. व रोख रक्कम ३५,०००/- रु. असा एकुण १,३५,५००/- रु. चा माल चोरुन नेला आहे. अशा मजकुराच्या त्यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द पोलीस ठाणे, तुळजापूर येथे भा.दं.वि. कलम ४५७, ३८० अन्वये गुन्हा दि. ०८.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**"उस्मानाबाद: बेकायदेशीर जमाव जमवुन मारहान."**

**पोलीस ठाणे, उस्मानाबाद(शहर):** १) प्रतापसिंह शेंडगे २) संकेत बागल ३) दादा निंबाळकर तिघे रा. तांबरी विभाग, उस्मानाबाद व अन्य पाच अनोळखी पुरुष (नावे माहित नाहीत) यांनी दि. ०८.०९.२०१९ रोजी ०७.३० वा. सु. अंबाला हॉटेल समोर, उस्मानाबाद येथे बेकायदेशीर जमाव जमवुन जुन्या भांडणाची कुरापत काढुन लखन अनिल सुर्यवंशी रा. सांजा, ता.उस्मानाबाद यांना शिवीगाळ करुन व लाथाबुक्क्यांनी, लाकडाने मारहान केली. यात लखन सुर्यवंशी यांच्या डोक्यास जखम होउन रक्तस्त्राव झाला. अशा मजकुराच्या लखन सुर्यवंशी यांनी वैद्यकीय उपचारादरम्यान (एम.एल.सी.) दिलेल्या जबाबावरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, उस्मानाबाद (श.) येथे भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, १४९, ३२४ सह म.पो.का. कलम ३५ (१) व (३) प्रमाणे गुन्हा दि. ०९.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**"मोटार वाहन कायदा-नियमांचे उल्लंघन: ११२ कारवाया."**

**उस्मानाबाद जिल्हा:** दि. ०८/०९/२०१९ रोजी उस्मानाबाद जिल्हयातील १८ पोलीस ठाणी व जिल्हा वाहतुक शाखा उस्मानाबाद यांनी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांविरुध्द मोटार वाहन कायद्याच्या विविध कलम-नियमांनुसार ११२ कारवाया केल्या असुन त्यातुन २२,४०० ₹ **'तडजोड शुल्क'** वसुल करण्यात आले आहे.

---

**स्वाक्षरीत**

**(विनोद ज. चौधीरी)**
सहा.पोलीस निरीक्षक
जनसंपर्क विभाग,उस्मानाबाद

प्रति,

मा.संपादक .........................................................................

आपल्या प्रसारमाध्यमांमध्ये हे पत्रक प्रसिध्दीस देण्यास विनंती आहे.